सगळ्यात दुःखी राजा

कधी-कधी दुःखी होणं
चांगलं असतं.



क्रिस वर्मेल

सगळ्यात दुःखी राजा



क्रिस वर्मेल

मराठी : अश्विनी बर्वे

कधी एक असा देश होता, जिथले लोक नेहमी खुश असत.
कोणतीही गोष्ट त्यांना कधी उदास, दुःखी करत नसे.



सूर्यास्त होईपर्यंत ते स्मित करत आणि हसत असत...




…पण ते तेव्हाही स्मित करत आणि हसत जेव्हा पाऊस येई.



आणि जेव्हा बर्फ पडे आणि त्यांचे दात एखाद्या ऑर्केस्ट्रासारखे कडकड करत, तेव्हाही ते खुश राहत आणि हसत असत.





जेव्हा त्यांना सुंदर फुलांचे गुच्छ मिळत तेव्हा ते प्रसन्न होत असत. पण फुलं सुकून गेली तरी ते खुश असत. एक सडलेले सफरचंद मिळाल्यावर सुद्धा तेवढेच खुश होत जेवढे चॉकलेटचा डबा मिळाल्यावर खुश होत.

जर कोणी घसरून आपल्या डोक्यावर पडलं तर ते कदाचित असं म्हणत, “आपल्याला किती चांगली संधी मिळाली आहे. मला वाटतं अशी टक्कर होऊन आलेली सूज मला शोभते, हो की नाही?” आणि जर रात्रीचं खाणं जळालं तर ते म्हणत, “छान! आम्हांला असेच जेवण आवडते.”



कोणतीही गोष्ट त्या लोकांना कधी दुःखी करत नसे. ते नेहमी खुश राहत, कमीत-कमी दुरून तरी असेच वाटे. पण तुम्हांला माहित आहे का? त्यांच्याजवळ याशिवाय दुसरा कोणता चाराच नव्हता. दुःखी होणं त्यांच्या देशाच्या कायद्याच्या विरोधात होतं. दुःखी व्हायला देशात परवानगी नव्हती.

राजाच्या आदेशानुसार खुश राहणे अनिवार्य होते.

आणि असं म्हटलं जाई की राजा देशातला सगळ्यात सुखी व्यक्ती होता. त्या देशातले सगळे लोक कदाचित नेहमी सुखी आणी खुश राहिले असते, पण एक दिवस एक घटना घडली.



.... एक छोट्या मुलाने देशाचा कायदा मोडला,
तो मुलगा रडला.



तो मुलगा भर दिवसा शहरातल्या चौकात, राजाच्या महान मूर्तीसमोर रडला, आणि कोणीही त्याला रडण्यापासून थांबवू शकले नाही. त्यांनी त्याचे सांत्वन करण्याचे प्रयत्न केले. लोक त्याच्या समोर नाचले-गायले. त्यांनी त्याला बिस्किट, आईसक्रिम दिले. पण त्याला काही फरक पडला नाही. ते त्याला खुश करू शकले नाहीत.



“जर तू लवकर हसला नाहीतर राजाचे पहारेकरी तुला येऊन पकडून घेवून जातील.” एका म्हाताऱ्या बाईने छोट्या मुलाला सांगितले. “मग ते तुला महालात घेवून जातील. तिथं एक काळ कोठी आहे, तिथं ते लोकांना हसवतात. ते लोकांना बांधतात आणि त्यांना पंख्याने गुदगुल्या करतात.”





आणि मग लवकरच राजाचे पहारेकरी आले आणि मुलाला पकडून महालात घेवून गेले.

राजा दिसायला खूप विशेष होता. मुलाने आतापर्यंत कोणत्याही चेहऱ्यावर एवढं लंबचौडं हसू बघितलं नव्हतं.

“हा हा हा!" राजा हसला. “आमच्याकडे हे काय होत आहे एक दुःखी मुलगा? अशक्य! या देशात प्रत्येकजण खुश आहे.”

“नाही, लोक खुश नाहीत,” मुलगा म्हणाला, “ते लोक फक्त दिखावा करतात. वास्तवात ते खुश नाहीत.”

“बघ आमचे लोक खुश आहेत!” राजा हसला. “कोणी उगाच कशाला दुःखी होईल?”

“पण मला दुःखी व्हायचं आहे,” मुलगा म्हणाला.

“पण .. पण... का?” राजाने विचारलं.





“माझ्या कुत्र्यामुळे,” मुलगा म्हणाला. “माझ्याजवळ एक कुत्रा होता आणि तो जगातला सगळ्यात चांगला कुत्रा होता.





“मी माझ्या कुत्र्यावर खूप प्रेम करत असे आणि त्याचे पण माझ्यावर प्रेम होते. माझा कुत्रा खूप हुशार होता. तो माझा सगळ्यात चांगला मित्र होता.

“पण एक दिवस तो आजारी पडला आणि मग तो मरून गेला. म्हणून मी कधी कधी दुःखी होतो. आणि मला या गोष्टीची पर्वा नाही की तुम्ही माझ्या बरोबर कसं वागाल? मी दुःखी राहील,कारण मला दुःखी व्हायचं आहे.”



राजाने काहीच केलं नाही. तो फक्त आपले विशाल स्थिर हास्य करत मुलाकडे बघत राहिला. तेव्हा राजा काहीतरी विचित्र आवाज करू लागला. तो स्फुंदू लागला, आतल्या आत हुंदके देवू लागला...ते खूप विचित्र होतं,कारण तो अजूनही एका कानापासून ते दुसऱ्या कानापर्यंत हसत होता. मुलगा खूप हैराण झाला आणि मग त्याने राजाकडे जवळ जाऊन पहिले.मग मुलगा ओरडला, “तुम्ही मुखवटा का घातला आहे!” आणि याच्या आधी राजा हलणार, मुलाने राजाच्या चेहऱ्यावरचा मुखवटा ओढून काढला.



मुखवट्याच्या मागे मुलाने आतापर्यंतचा सगळ्यात

उदास चेहरा पाहिला.

महान राजाच्या गालावर अश्रू ओघळत होते.

“मी एक खुश राजा नाही,” तो ओरडला.





“कारण माझ्याजवळ पण एक कुत्रा होता, आणि तो माझा सगळ्यात चांगला दोस्त होता. तो माझा एकमेव मित्र होता. प्रत्येकजण मला पसंत करण्याचा दिखावा करतात,कारण की मी राजा आहे, पण केवळ माझं कुत्रंच वास्तवात माझ्यावर प्रेम करत असे. तो माझी चप्पल चावून चावून तुकडे–तुकडे करत असे. आणि माझ्या अंथरुणावरील कपडे ओढत असे आणि माझे खायचे ताट सुद्धा चोरत असे. केवळ माझं कुत्रंच माझा खरा मित्र होता.





“आणि मग तो म्हातारा होऊन मेला. त्यानंतर मी उदास झालो. माझ्या उपस्थितीत कोणी हसण्याची हिंमत केली नाही आणि महाल एक दुःखी जागा झाली. मला वाटे की महाल परत एकदा आनंदाची जागा व्हावी, म्हणून मी एक कायदा तयार केला आणि खुश राहणे अनिवार्य केले. आणि लवकरच मी हि सगळ्यांसारखे खुश राहण्याचे नाटक करू लागलो.”



“दुःखी होणं ठीक आहे,” मुलगा म्हणाला. “प्रत्येकाला कधी ना कधी दुःखी व्हायला पाहिजे. जेव्हा मी दुःखी होतो, तेव्हा मी माझ्या कुत्र्याबद्दल विचार करतो आणि तेव्हा मला त्याच्या खोड्या आठवतात ज्या तो करायचा.”



हे ऐकून राजाने वर बघितलं आणि म्हटलं, “जेव्हा मी फिडल वाजवत असे तेव्हा माझा कुत्रा आपल्या मागच्या पायांवर उभं राहून नाचत असे.”

“खूप छान!” मुलगा म्हणाला. “ही तर खूप हुशारीची गोष्ट आहे. माझा कुत्रा एक रिंग मधून उडी मारून कारनामा दाखवत असे!”





“खरंच?" राजाणे विचारलं. “माझा कुत्रा फार खोडकर होता, तो महालातल्या स्वयंपाक घरातून मासाचे तुकडे पळवत असे.”





“माझा कुत्रा फार गोंधळ घालत असे!” मुलगा म्हणाला.
“एकदा त्याने माझ्या आईची कपडे वाळत घालण्याच्या दोरीवरील सर्व कपडे खाली ओढले आणि ते चिखलात नेऊन लोळवले.”
“काय सांगतोस!" राजा हसला आणि लवकरच ते दोघं बरोबर हसू लागले आणि आपआपला आनंदी क्षणाची आठवण करू लागले.



ते दोघं थोडे रडले सुद्‌धा.
“लोकांनी तेच केलं पाहिजे जे त्यांना वाटतं,” मुलगा म्हणाला.
“नक्कीच, मला तुझं म्हणणं पटलं,” राजा म्हणाला. “मी मुर्खपणा केला!”



आणि त्याचवेळी राजाने तो विशेष आदेश फाडून टाकला, ज्यात खुश राहणे अनिवार्य होते. त्या दिवसापासून, सगळ्यांना जे वाटतं तसं वागायला मोकलित होती.

तुम्हांला माहित आहे का मग काय झालं?



देशातील सगळ्या लोकांना रडणे चांगलं वाटू लागलं.

.. कारण खूप वर्षांपासून त्यांच्यातलं कोणी रडलंच नव्हतं.

